ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : २०/०८/२०१४

**मा.सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**

सभा क्रमांक १४, दिनांक २०/०८/२०१४

सभा सूचना क्रमांक ०५, दिनांक ११/०८/२०१४

सभा क्रमांक १, दिनांक २०/०८/२०१४

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २०/०८/२०१४रोजी सभा सूचना क्रमांक ०५, दिनांक ११/०८/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य खालील प्रमाणे :-

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील - महापौर**
**२) श्री.मुकेश मधुकर मोकाशी - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरज प्रगती भारत | ४ | नरेश रतन मणेरा |
| ५ | मढवी बिंदू महेंद्र | ६ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ७ | श्री साप्ते राजेंद रमेश | ८ | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ९ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | १० | मधुकर रामचंद्र पावशे |
| ११ | स्नेहा अंकुश पाटील | १२ | भोईर संजय देवराम |
| १३ | उषा संजय भोईर | १४ | मोरे संजय भाऊराव |
| १५ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १६ | चव्हाण सुधाकर वामन |
| १७ | चव्हाण तेजस्विनी किरण | १८ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १९ | वाव्हळ सुभाष सिताराम | २० | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| २१ | संभाजी धोंडिराम पंडीत | २२ | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २३ | विलास चंदू कांबळे | २४ | राजकुमार रामनयन यादव |
| २५ | राधा फत्तेबहादूर सिंह | २६ | सरैय्या अमित जयसिंग |
| २७ | जाधवर राधाबाई सुभाष | २८ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २९ | पाटील वर्षा वसंत | ३० | पालांडे दशरथ बाबुराव |
| ३१ | भोईर विमल अर्जून | ३२ | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| ३३ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३४ | पांडे संजय श्रीनाथ |
| ३५ | लासे विजया मनोज | ३६ | पाटील शारदा विजय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | पाटील उमेश काशिनाथ | ३८ | गौरी अनिता सुनील |
| ३९ | देसाई सुहास सुर्यकांत | ४० | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ४१ | नंदा कृष्णा पाटील | ४२ | महेश्वरी संजय तरे |
| ४३ | कणसे निर्मला शरद | ४४ | एगडे रामचंद्र हरी |
| ४५ | बोरीटकर प्रभा अशोक | ४६ | नंदिनी राजन विचारे |
| ४७ | भोईर एकता एकनाथ | ४८ | वडवले संतोष वसंत |
| ४९ | जितेंद्र प्रभाकर वाघ | ५० | वैती अशोक बारकू |
| ५१ | शिंदे मनोज तुकाराम | ५२ | तायडे रामभाऊ महादेव |
| ५३ | काशिराम गोविंद राऊत | ५४ | आशा बाबासाहेब कांबळे |
| ५५ | मोरे संध्या सुनिल | ५६ | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| ५७ | जानकर योगेश तातोबा | ५८ | घाडीगांवकर संजय पांडुरंग |
| ५९ | वेतकर दिपक विजय | ६० | खताळ विशाखा मधुकर |
| ६१ | भोसले नम्रता दिपक | ६२ | म्हस्के नरेश गणपत |
| ६३ | हिराकांत बेंडू फर्डे | ६४ | पाटील सुजाता भास्कर |
| ६५ | मोरे रुचिता राजेश | ६६ | नारायण शंकर पवार |
| ६७ | सोनार सारिका संजय | ६८ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६९ | नजीब सुलेमान मुल्ला | ७० | वहिदा मुस्तफा खान |
| ७१ | साळवी अपर्णा मिलींद | ७२ | मनिषा महेश साळवी |
| ७३ | महेश जगन्नाथ साळवी | ७४ | पाटील मिलींद भारत |
| ७५ | केणी प्रमिला मुकूंद | ७६ | केणी मुकूंद बाळू |
| ७७ | हंडोरे मेघना सुनिल | ७८ | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ७९ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ८० | सामंत विलास शिवराम |
| ८१ | पाटील मालती रमाकांत | ८२ | संजय संतू वाघुले |
| ८३ | रेखा भालचंद्र पाटील | ८४ | भरत अभिमन्यु चव्हाण |
| ८५ | नाईक राजश्री सुनिल | ८६ | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| ८७ | ठाकूर अक्षय अनंत | ८८ | राजे गिरीश अनंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ८९ | कळंबे मंगल चंद्रकांत | ९० | पाटील अवंतिका शशिकांत |
| ८१ | कुरेशी साजिया आई | ९२ | यादव रिटा राजनाथ |
| ९३ | असिया यासिन कुरेशी | ९४ | काकडे बालाजी दगडू |
| ९५ | गोटे सिंधू कुंदन | ९६ | कुरेशी यासीन अय्युब |
| ९७ | किणे राजन नारायण | ९८ | विश्वनाथ भगत |
| ९९ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | १०० | भगत सुधीर रामचंद्र |
| १०१ | आशरीन इब्राहीम राऊत | १०२ | पाटील रेश्मा रमेश |
| १०३ | पाटील शैलेश मनोहर | १०४ | पठाण अशरफ उस्तान |
| १०५ | खान मिराज नईम | १०६ | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| १०७ | हिरा सिताराम पाटील | १०८ | मुंडे सुनिता गणेश |

गैरहजर सदस्य खलीलप्रमाणे:

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डुंबरे मनोहर जयसिंग | २. | सरनाईक परिषा प्रताप |
| ३. | सरनाईक विहंग प्रताप | ४. | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर |
| ५. | मिलिंद माधव पाटणकर | ६. | संगिता माणिक पाटील |
| ७. | जगताप अश्विनी अशोक | ८. | संखे मिनल मुकूंद |
| ९. | महेश सुरेश वाघ | १०. | वाघ पुजा गणेश |
| ११. | साळवी मनोहर रामा | १२. | अनिता अरुण बिर्जे |
| १३. | राजेश भालचंद्र गवारी | १४. | डोंगरे सिराज महम्मद अली |
| १५. | अन्सारी साजिया परवीन सरफराज | | |

रजा सदस्य खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १. | मंदार प्रमोद विचारे |

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास मा.महापौर सो. पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतात.

तद्नंतर सभेला सुरुवात होते.

मा.सचिव :

आजच्या सभेला सन्मा.सदस्य श्री मंदार प्रमोद विचारे यांचा रजेचा अर्ज आहे.

महापौर महोदय,आजच्या सभेपुढे तीन दुखवटा प्राप्त झाले आहेत ते मी वाचुन दाखविते.

प्रति,
मा.महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : दुखवटा ठराव

महोदय,

पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यात वसलेल्या आदिवासी दुर्गम माळीण गावातील सारे गावकरी साखरझोपेत असतानाच दिनांक ३० जुलै २०१४ रोजी पहाटे काळाने घाला घातला. तीन-चार घरे वगळता माळीण हे अख्खे गावच डोंगराने गिळले. डोंगरकडा कोसळुन सुमारे ४४ घरे ढिगा-याखाली गाडले गेली. या भीषण दुर्घटनेमध्ये सुमारे १५१ नागरीक मृत्युमुखी पडले असुन, तेथील नागरीकांची घरेच नष्ट झाली आहेत. या दुर्घटनेमुळे संपूर्ण राज्यात तसेच देशभरात हळहळ व्यक्त होत आहे.

आंबेगांव तालुक्यातील डिंबे धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील बुब्रा नदीच्या काळावर माळीणं हे गांव वसले होते. हे गांव ६० घरांचे होते व येथे सुमारे ७०४ लोकसंख्या होती. डोंगरउतारावर वसलेल्या गावातील लोकं डोंगरावरच नाचणी, तांदुळ अशी पिके घेऊन कुटुंबाचे पालनपोषण करीत होते. डोंगरावरील सुका मेवा गोळा करुन तो बाजारात विकुन स्वत:च्या कुटुंबाचे पालनपोषण करीत असत.

डिंबे धरणाच्या आत दुर्गम आदिवासी भागातील माळीण या गावावर पहाटेच्या सुमारास डोंगरकडा कोसळला असुन तेथे २०ते २५ फुटांचा मातीचा ढिगारा गावावर साचला. त्यामध्ये अख्खे माळीण गांव ढिगा-याखाली गाडले गेले. यामध्ये मोठया प्रमाणात नागरीक मृत पावले असुन त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो याकरीता आम्ही दुखवटा ठराव सादर करीत आहोत. तरी कृपया माळीण गावातील दुर्घटनेत मृत पावलेल्या नागरीकांना आगामी सर्वसाधारण सभेत भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती आहे.

सूचक : श्री.नरेश गणपत म्हस्के अनुमोदक : श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे.

मा.सचिव अभिनेत्री स्मिता तळवलकर यांचा दुखवटा ठराव वाचुन दाखवितात.

महोदय,

मराठी रंगभूमी, चित्रपट, नाटक मालिकांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणा-या निर्मात्या दिग्दर्शक, अभिनेत्री स्मिता तळवलकर यांचे कर्करोगाने बुधवार दिनांक ६.८.२०१४ रोजी पहाटे जसलोक रुग्णालयात दु;खद निधन झाले. त्याप्रसंगी त्या ५९ वर्षांचे होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा अंबर, मुलगी आरती, सून सुलेखा असा परिवार आहे. गेले अनेक दिवस स्मिता तळवलकर यांची प्रकृती गंभीर होती. त्यांना जसलोक रुग्णालयात दाखल करण्यांत आले होते. काही वर्षे त्यांची कर्करोगाशी झुंज सुरु होती. त्यांची ही झुंज बुधवारी पहाटे संपली आणि नाटय-चित्रपट सृष्टीतील स्मित मावळले.

स्मिता तळवलकर यांनी मुंबई दूरदर्शन केंद्रांवर वृत्तनिवेदिका म्हणून त्यांनी कादकीर्दीला प्रारंभ केला. गेली ४० वर्षे अभिनय, निर्मिती, दिग्दर्शन यात आपले श्रेष्ठत्व सिध्द केले. अस्मिता चित्र या चित्रपट निर्मिती संस्थेच्या बॅनरखाली त्यांनी दर्जेदार चित्रपटांची निर्मिती केली. सोबतच मालिका व नाटकांमध्येही त्यांनी आव्हानात्मक विषय मांडले. राष्ट्रीय पुरस्कारांच्याही त्या मानकरी होत्या.

कायम प्रसन्न व्यक्तिमत्व असणारी ही गुणी अभिनेत्री वयाच्या १७ व्या वर्षापासून वृत्त निवेदिका म्हणून मराठी रसिकांपुढे आली. जबरदस्त आत्मविश्वास, स्पष्ट शब्दोच्चार आणि कलेशी असणारी प्रामाणिकता या त्यांच्या गुणांमुळे त्यांच्या भोवती एक वलय निर्माण झाले होते. छावा,अभिनय, अपराध मीच केला, काचेचा चंद्र, गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या, दुर्गाबाई जरा जपून अशा १०-१२ नाटकांतून त्यांनी आपल्या अभिनयाची चुणूक दाखविली. १९८९ साली अस्मिता चित्र तर्फे कळत नकळत या चित्रपटातून त्यांनी चित्रपट निर्मिती क्षेत्रात दमदास पाऊल टाकले. चौकट राजा, कळत नकळत या चित्रपटांना राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. सवत माझी लाडकी, राव साहेब, तू तिथे मी, घराबाहेर, आनंदाचे झाड या चित्रपटांनाही रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. राऊ, अवंतिका, पेशवाई, सुहासिनी, ऊन पाऊस, उंच माझा झोका या मालिकांचेही रसिकांनी स्वागतच केले. यंदाचा सर्वश्रेष्ठ कला गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यांत आले होते.

कर्करोगाने गेल्या वर्षी त्यांना गाठले, पण उपचारानंतर त्यांची प्रकृती सुधारत होती. अचानक गेल्या महिनाभर पुन्हा आजार बळावला आणि मुंबईच्या जसलोक रुग्णालयामध्ये दाखल करण्यांत आले. गेले काही दिवस त्यांची प्रकृती अधिकच बिघडली आणि त्यामध्येच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे नाटक, चित्रपट सृष्टीची मोठया प्रमाणात नुकसान झाले असून, त्यांच्या जाण्याने जणू मराठी रसिकांच्या काळजाचाच ठोका चुकला आहे.

वृत्त निवेदिका ते उत्कृष्ठ अभिनेत्री, रंगकर्मी ते चित्रपट निर्मात्या, दिग्दर्शक अशी यशस्वी वाटचाल करणा-या ज्येष्ठ अभिनेत्री स्मिता तळवळकर यांचे निधनाने नाटक व चित्रपट सृष्टीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून त्यांच्या आत्म्यास चिरंशाती लाभो यासाठी आम्ही मन:पूर्वक श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तरी कृपया सदर दु:खवटा ठराव माहे ऑगस्ट २०१४ च्या मा.सर्वसाधारण सभेपुढे घेऊन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करावी, ही विनंती.

मा.सचिव श्रीमती कुसुम माधव पाटणकर यांचा दुखवटा ठराव वाचुन दाखवितात.

प्रति,
मा.महापौर सो,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : दुखवटा ठराव .

महोदय,

ठाणे महानगरपालिकेचे विदयमान सदस्य व माजी उपमहापौर श्री.मिलिंद माधव पाटणकर हयांच्या मातोश्री श्रीमती कुसुम माधव पाटणकर हयांना शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी अल्पश: आजाराने देवाज्ञा झाली त्यावेळी त्या ७७ वर्षाच्या होत्या.

कै.कुसुम माधव पाटणकर हया सुरुवातीच्या काळात चाळीसगांव येथील राष्ट्रीय विदयालयात शिक्षिका होत्या. सुमारे १० वर्षे त्यांनी या शाळेत विदयादानाचे कार्य केलेले आहे. त्यानंतर भिवंडी येथील BNN महाविदयालयामध्ये प्राध्यापिका म्हणून १९७० ते १९९७ पर्यंत कार्यरत होत्या. याच दरम्यान त्यांनी भिवंडी येथे फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या चेअरपर्सन म्हणून यशस्वीपणे कार्यभार सांभाळला होता. त्याचप्रमाणे मुंबई युनिर्व्हसिटीच्या हिस्ट्री विभागाच्या बोर्ड ऑफ स्टडीजच्या मेंबर म्हणून देखिल त्यांनी काम पाहिले. अत्यंत शिस्तप्रिय

स्वभावाच्या व प्रगतीशील विचारांच्या कै.कुसुम पाटणकर हया विदयार्थ्यांमध्ये देखिल खुप लोकप्रिय होत्या. कै.कुसुम पाटणकर हया वृंदावन परिसरातील चित्पावन संघाच्या अध्यक्षपदी देखिल कार्यरत होत्या.

अशा या कार्यतत्पर व उच्चविद्याविभुषित कै.कुसुम पाटणकर हयांच्यामागे त्यांचे सुपुत्र, स्नुषा आणि नातवंडे असा परिवार आहे. कै.कुसुम पाटणकर हयांचे निधनामुळे वृंदावन पसिरावर शोककळा पसरली आहे. कै.कुसुम पाटणकर यांच्या निधनाने कुटुंबियांना झालेल्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी होत असुन कै.कुसुम पाटणकर हयांना चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, माळीण दुर्घटना,श्रीमती स्मिता तळवलकर तसेच माजी नगरसेवक श्री.राजेश ठाकुर तसेच माजी नगरसेविका श्रीमती मनिषा पाटील,तसेच या सभागृहातील सदस्य श्री.मिलिंद पाटणकर यांच्या मातोश्री,तसेच शिवसेनेचे शाखाप्रमुख जेष्ठ शिवसैनिक बबन सकपाळ यांचे या काळामध्ये झालेल्या निधनाबद्दल आज हे सभागृह तहकूब करावे अशाप्रकारी मी आपल्याला विनंती करतो. तसेच माजी नगरसेवीका श्रीमती मनिषा पाटील तसेच माजी नगरसेवक श्री.राजेश ठाकुर यांचेबाबत मी पत्र दिलेमले आहे तरी यांचाही दुखवटा ठराव करण्यांत यावा.

श्री.संजय वाघुले :

महापौर महोदय, माळीण दुर्घटना तसेच आपले माजी नगरसेवक यांचे निधनाबद्दल आजची सभा अर्धा तासाकरीता तहकूब करावी अशी मी आपणास विनंती करतो.

मा.महापौर :

सन्मा. सदस्यांच्या विनंतीचा मान ठेऊन आजची सभा अर्धा तासाकरीता तहकूब करण्यात येत आहे. तसेच आता आपण श्रध्दांजली अर्पण करुया.

सभा अर्ध्या तासाकरीता तहकूब करण्यांत येते.

**: दुखवटा ठराव :**

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक : ८६ दिनांक :२०/८/२०१४

ठ रा व :

महाराष्ट्र राज्यातील पुणे येथील एक गांव , माळीण, आंबेगांव या गावावर दि. ३० जुलै २०१४ रोजी अतिवृष्टीने दरड कोसळून व या नैसर्गिक आपत्तीत एकूण १५१ नागरिक मृत्युमुखी पडलेले आहेत त्याबददृल या सर्वसाधारण सभेत तीव्र दुःख होत आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे माळीण येथील नागरिकांवर कोसळलेल्या दुःखात ही सर्वसाधारण सभा सहभागी होत असून त्यांचे मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गति लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्द्‌ांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के अनुमोदक:श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर.

सही/ हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**: दुखवटा ठराव :**

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक : ८७ दिनांक :२०/८/२०१४

ठ रा व :

ठाणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेवीका व राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या धडाडीच्या पदाधिकारी सौ. मनिषा पुरुषोत्तम पाटील यांचे दिनांक ७.८.२०१४ रोजी सायंकाळी अल्पशः आजाराने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ४२ वर्षाचे होते. त्यांचे पश्चात्त पती आणि दोन मुले असा परिवार आहे.

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ मध्ये कै.सौ.मनिषा पाटील या वाघबीळ प्रभागातुन निवडुन आल्या होत्या. अनेक संस्था संघटनांना त्यांचा खुप आधार होता. त्यांच्या निधनामुळे ठाण्यात शोककळा पसरली आहे.

कै.सौ. मनिषा पुरुषोत्तम पाटील यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती लाभो अशी इश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपुर्ण श्रध्दांजलीअर्पण करीत आहे

सूचक : श्री.नरेश म्हस्के अनुमोदक:श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर.

सही/ हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर
ठाणे महानगरपालिका,ठाणे

२

**दुखवटा ठराव :**

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक : ८० दिनांक :२०/८/२०१४

ठराव :

ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.राजेश ठाकूर हयांचे अकस्मात दु:खद निधन झाल्याचे वाचून ही सर्वसाधारण सभा तीव्र दु:ख व्यक्त करीत आहे.

कै.राजेश ठाकूर हे राष्ट्रवादी पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते होते. कै.राजेश ठाकूर हयांनी पक्षाच्या माध्यमातून विविध लोकपयोगी व समाजहिताची कामे केलेली असून समाजकारणातील त्यांचे योगदान निश्चितच कौतुकास्पद असेच आहे.

कै.राजेश ठाकूर हयांचे आकस्मिक निधनाने त्यांचे कुटुंबियांवर कोसळलेल्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी होत असून त्यांचे मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गति लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के अनुमोदकः श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर.

सही: हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**: दुखवटा ठराव :**

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक : ८१ दिनांक :२०/८/२०१४

ठराव :

जेष्ठ पत्रकार, साक्षेपी संपादक, हिंदुत्ववादी विचारवंत श्री.ब.ना.जोग हयांचे दि.१३ ऑगस्ट २०१४ रोजी अकस्मात दु:खद निधन झाल्याचे वाचून ही सर्वसाधारण सभा तीव्र दु:ख व्यक्त करीत आहे.

कै.ब.ना.जोग हयांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून विविध लोकपयोगी व समाजहिताची कामे केलेली असून समाजकारणातील त्यांचे योगदान निश्चितच कौतुकास्पद असेच आहे.

कै.ब.ना.जोग हयांचे आकस्मिक निधनाने त्यांचे कुटुंबियांवर कोसळलेल्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी होत असून त्यांचे मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गति लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के अनुमोदकः श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर.

सही/ हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर
ठाणे महानगरपालिका,ठाणे

सभा तहकूब झाल्याचे मा.महापौर जाहिर करतांत.

सही : हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर
ठाणे महानगरपालिका,ठाणे

( सौ.छाया प्रकाश मानकर )
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी २.४० वा.
महापालिका सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक : २०/८/२०१४